२) अधिकार प्रदान आदेश क्र.प्रशा/२/कावि/४४६/१५ दिनांक २०/१०/२०१५
३) मुख्याध्यापक,माध्यमिक विद्यालय निगडी यांचे दि.०८/१२/२०१६ रोजीचे पत्र
४) मा.लेखाधिकारी यांचेकडील दि.२४/११/२०१६ रोजीचे घरबांधणी अग्रीम नाहरकत प्रमाणपत्र.
५) मा.शिक्षणाधिकारी यांचेकडील दि. २७/१२/२०१६ रोजीचा मान्य प्रस्ताव.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ १०८.
माध्यमिक शिक्षण विभाग
क्र.माध्य/शि/१/कावि/१८२०/१६
दिनांक :- २७/१२/२०१६

विषय :- नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीबाबत.
श्री.चव्हाण हिम्मत मंगाराम, पदनाम-सहाय्यक शिक्षक
(संगणक क्र.५९३०)

आदेश,

श्री.चव्हाण हिम्मत मंगाराम हे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील सहाय्यक शिक्षक या गट क मधील पदावर माध्यमिक विद्यालय निगडी येथे कामकाज करीत आहेत. दिनांक २५/९/१९८९ रोजी ते म.न.पा.मध्ये सहाय्यक शिक्षक पदावर रूजू झालेले आहेत. त्यांच्या सेवानोंद पुस्तकामधील नोंदीनुसार त्यांची जन्मतारीख ०२/०१/१९५९ अशी असून,दिनांक ०१/०१/२०१७ रोजी त्यांच्या वयास ५८ वर्ष पूर्ण होत आहेत.

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम -१९८२ मधील नियम १०(१).नुसार गट क मधील कर्मचा-यांना वयाची ५८ वर्षे पूर्ण होतील त्या महिन्याच्या शेवटच्या तारखेस नियत वयोमानानुसार मध्यान्होत्तर सेवानिवृत करणे आवश्यक आहे.

मुख्याध्यापक माध्यमिक विद्यालय निगडी यांनी दिनांक ०८/१२/२०१६ रोजीच्या पत्रान्वये श्री.चव्हाण हिम्मत मंगाराम, सहाय्यक शिक्षक यांचेकडून म.न.पा.चे घरबांधणी कर्ज, वाहन कर्ज,संगणक कर्ज येणे बाकी नसलेबाबत दाखले सादर केले आहेत. त्यांचे नांवे माध्यमिक शिक्षक सहकारी पतपेढीचे कर्ज र.रु. ५,००,०००/- (अक्षरी र.रु. पाच लाख) फक्त बाकी आहे. तसेच श्री.चव्हाण हिम्मत मंगाराम, सहाय्यक शिक्षक यांना देय असलेल्या रक्कमेतुन कपात करून घेणेबाबतचा विनंती अर्ज मुख्याध्यापक ~~[illegible]~~ निगडी यांनी सादर केलेला आहे. श्री.चव्हाण हिम्मत मंगाराम सहाय्यक शिक्षक यांना सेवासातत्य देण्यात आलेले आहे. तसेच त्यांचे विरूध्द कोणत्याही प्रकारची खातेनिहाय चौकशी चालु अथवा प्रस्तावित नाही असा अहवाल मुख्याध्यापक यांनी सादर केला असून त्यांना दिनांक ३१/१/२०१७ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त करणेस शिफारस केली आहे.

श्री.चव्हाण हिम्मत मंगाराम, सहाय्यक शिक्षक यांना सेवासातत्य दिले असल्याने त्यांचे संदर्भात भविष्यात लेखा परिक्षणाची वसुली निघाल्यास त्याची संपूर्ण रक्कम संबंधिताचे निवृत्ती वेतनामधून वसूल करणेस अधिन राहून रूजू दिनांक २५/६/१९८६ या प्रमाणे नोंद घेणेत यावी.

सबब,मुख्याध्यापक, माध्यमिक विद्यालय निगडी यांचेकडील दिनांक ८/१२/२०१६ रोजीचा अहवाल,महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन)नियमातील उक्त तरतूद विचारात घेवून उपरोक्त वाचले क्र.२ चे आदेशान्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांनुसार श्री.चव्हाण हिम्मत मंगाराम, सहाय्यक शिक्षक यांना दि.३१/०१/२०१७ रोजी मध्यान्होत्तर महापालिका सेवेतून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त करणेस या आदेशान्वये मान्यता देण्यात येत आहे.

प्रस्तुत आदेशाची नोंद श्री.चव्हाण हिम्मत मंगाराम, सहाय्यक शिक्षक यांचे सेवानोंद पुस्तकात घेण्यात यावी.

Kamble
प्र.शिक्षणाधिकारी
माध्यमिक शिक्षण विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

प्रती,

श्री.चव्हाण हिम्मत मंगाराम,सहाय्यक शिक्षक माध्यमिक विद्यालय निगडी

प्रत :- १) लेखा विभाग
२) प्रशासन,कर्मचारी वैयक्तिक नोंद कक्ष,संगणक कक्ष (प्रशासन)
सेवाजेष्ठता कक्ष,मागासवर्गीय कक्ष,कामगार कल्याण विभाग
३) माध्यमिक विभाग टेबल क्र. २ व ४,४) माध्यमिक विद्यालय निगडी, २/- पुढील कार्यवाहीसाठी.



Scanned with CamScanner